Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
*(https://jetjournal.us/)*
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

# शिक्षण, साहित्य आणि सामाजिक परिवर्तन यांचा त्रिवेणी संगम : सावित्रीबाई फुले

**प्रा. अस्मिता शशिकांत हिंगोणेकर,** संशोधक, सहाय्यक प्राध्यापक, वेस्ट खान्देश भगिनी सेवा मंडळ संचलित कला व वाणिज्य महिला महाविद्यालय, देवपूर, धुळे
**डॉ. अमोल प्रकाश पाटील,** मार्गदर्शक, इतिहास विभाग प्रमुख, झेड. बी. पाटील महाविद्यालय, धुले जिला. धुले (महाराष्ट्र)

**सारांश**

19 व्या शतकात भारतीय समाजातील स्त्रियांविषयी असलेली अमानुष रूढी व परंपरा या विरुद्ध लढण्यासाठी स्त्री शिक्षण या मूलमंत्राचा सर्वप्रथम उपयोग करणारी स्त्री म्हणजेच क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले. समाजातील कठोर विरोधाला न जुमानता फुले दांपत्यांनी मुलींसाठी सर्वप्रथम शाळा सुरू केली. दलित व अस्पृश्य समाजातील विद्यार्थ्यांनी शिक्षण घ्यावं यासाठी अस्पृश्यांसाठी स्वतंत्र शाळा सुरू केली. सार्वजनिक विहिरी सुरू करण्याचा प्रयत्न केला. विधवा पुनर्विवाह घडवून आणण्यासाठी तसेच बाल विधवांना आश्रय देण्यासाठी सावित्रीबाई फुले यांनी बालविवाह प्रतिबंध गृहाची स्थापना केली. सावित्रीबाई फुले यांनी शैक्षणिक व सामाजिक कार्याबरोबरच समाज परिवर्तन घडवून आणण्यासाठी साहित्यातून देखील आपले परखड विचार समाजासमोर मांडले. समाजात अंधश्रद्धा निर्मूलन, सामाजिक समता व अन्यायाविरुद्ध त्यांनी आपले विचार कविता व भाषणे यामधून मांडले. त्यांचे विचार आजही प्रेरणादायी असून, समाजसुधारणेसाठी दिशादर्शक ठरतात. त्यांच्या कार्यामुळे आज भारतीय महिलांना विविध क्षेत्रांत पुढे जाण्याची संधी मिळाली आहे. त्यामुळे सावित्रीबाई फुलेंचा वारसा पुढे नेणे ही काळाची गरज आहे.

**प्रस्तावना**

स्वातंत्र्योत्तर काळात भारतातील महिलांनी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय प्रगती केली आहे. 'चूल आणि मूल' या चौकटीत मर्यादित असलेल्या स्त्रीला आज विज्ञान, तंत्रज्ञान, वैद्यकीय, सामाजिक, राजकीय तसेच अंतराळ, संशोधन अशा क्षेत्रांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावताना पाहायला मिळते. जसे विविध नद्या आपल्या मार्गाने वाहत जाऊन अथांग सागरात विलीन होतात, तसेच महिलांनीही कठीण परिस्थितींवर मात करून प्रगतीचा अथांग सागर निर्माण केला आहे. मात्र, प्रत्येक प्रवाहाचा एक उगम असतो. भारतीय स्त्रियांच्या सामाजिक आणि शैक्षणिक प्रगतीचा उगम म्हणजे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले. स्त्री-शिक्षण आणि महिला सक्षमीकरणाचा पाया महात्मा ज्योतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी रचला. त्यांच्या क्रांतिकारक कार्यामुळे आजच्या महिलांना विविध क्षेत्रांत स्वतंत्रपणे पुढे जाण्याची संधी मिळाली आहे.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

'जे जुने ते सोने' आणि 'जे नवे ते हवे' यातील संघर्ष सतत चालू असतो. समाज सुखी, संपन्न, समर्थ आणि प्रगत होण्यासाठी विचारांची प्रगल्भता आवश्यक असते. मात्र, परिवर्तनाच्या वाटचालीत पारंपरिक विचारसरणीला चिकटून राहिलेल्या लोकांचा विरोध होतोच. सावित्रीबाईंनी या विरोधाला न जुमानता स्त्री-शिक्षणाच्या प्रसारासाठी अतुलनीय कार्य केले. त्यांच्या कार्यामुळे भारतीय स्त्रीच्या शिक्षणाचा मार्ग मोकळा झाला आणि आज त्या कार्याचे फलित म्हणजे विविध क्षेत्रांत आघाडीवर असलेल्या भारतीय महिला. म्हणून "सावित्रीबाई म्हणजे भारतीय स्वातंत्र्य देवीच्या विशाल भाल प्रदेशावरील कुमकुमतिलकच होय आणि म्हणून स्त्री शिक्षणाच्या प्रचार व प्रसार कार्यात सावित्रीबाईंनी केलेले कार्य पाहता त्यांना आजच्या स्त्री शिक्षणाची अग्रुतीच म्हणावी लागेल".[1]

सावित्रीबाईंनी केवळ शिक्षण क्षेत्रातच नव्हे, तर सामाजिक आणि राजकीय स्तरावरही मोठे कार्य केले. त्यामुळे आजच्या काळात त्यांचे विचार आणि कार्य अधिक महत्त्वाचे ठरतात. भारतीय महिलांची प्रगती आणि त्यासाठी असलेली सावित्रीबाई फुलेंच्या कार्याची गरज, याचा अभ्यास करणे ही काळाची गरज आहे.

**सावित्रीबाई फुले यांचे शैक्षणिक कार्य**

सावित्रीबाई फुले या भारतातील पहिल्या शिक्षिका आणि स्त्री शिक्षणाच्या प्रवर्तक होत्या. १९ व्या शतकाचे व स्त्रियांना कुठल्याच अधिकार नव्हते, कुठलेच स्वातंत्र्य नव्हते अशा काळात समाजाच्या विरोधाला अन्यायाला न जुमानता त्यांनी स्त्री शिक्षणासाठी प्रदीर्घ संघर्ष केला. त्यांनी भारतातील पहिली मुलींची शाळा 1948 मध्ये पुणे येथे भिडे वाड्यात महात्मा ज्योतिराव फुले यांच्या समवेत स्थापन केली. या शाळेत सावित्रीबाई फुलेंनी सर्वसमावेशक म्हणजेच ब्राह्मण , मराठा दलित अशा सर्व जाती धर्मातील मुलांना शिक्षण देण्याचे कार्य सुरू केले. यामुळे त्यांना समाजाकडून विरोध सहन करावा लागला. पण या समाजकंटकांना सावित्रीबाईंनी समर्पकपणे उत्तर दिले, "माझ्या लहान-मोठ्या भावांनो, मी तुमच्या मुलींना,बहिणींना शिकवण्याचं कार्य करते आहे.तुम्ही मला दगड मारता, घाण फेकता पण त्याला मी फुलेच समजते."[2] सावित्रीबाईंनी 1851 पर्यंत तीन नव्या शाळा स्थापन केल्या. तसेच विधवा स्त्रियांसाठी शिक्षण व त्यांचे पुनर्वसन करण्याच्या उद्देशाने त्यांनी बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना केली. या ठिकाणी विधवा स्त्रियांचे शिक्षण व सुरक्षित निवारा हे कार्य महत्त्वाचे होते. सावित्रीबाई व ज्योतिबांनी अस्पृश्यांसाठी स्वतंत्र शाळा सुरू केल्या. "अर्धपोटी किंवा उपाशीपोटी मुलं शिकू शकत नाहीत शिकवताना त्यांच्या पोटाची काळजी घेणे आवश्यक आहे शिवाय त्यांच्या कपड्याला त्याकडे आणि आरोग्याकडे लक्ष देणे गरजेचे आहे".[3] हा सावित्रीबाईंचा शैक्षणिक अनुमान होता जो आजच्या काळात शाळेमध्ये शालेय पोषण आहात या संकल्पनेत आपणास दिसतो. भारतातील पहिली मुस्लिम शिक्षिका फातिमा शेख यांच्या सोबत सावित्रीबाई यांनी स्त्री शिक्षणाचा प्रसार केला. 1852 मध्ये पुणे नगरपालिकेने सावित्रीबाई फुले व फातिमा शेख यांच्या शैक्षणिक कार्याचा गौरव केला. केवळ मुलींनाच नव्हे तर प्रौढ शिक्षणासाठी देखील सावित्रीबाईंनी कार्य केलेले आहे. स्त्री पुरुष समानता व जातीव्यवस्था निर्मूलन यासाठी शिक्षणाला हत्यार म्हणून सावित्रीबाईंनी वापरले आहे. स्त्री शिक्षणाची पायाभरणी, प्रचार व प्रसार यासाठी सावित्रीबाईंनी आपले आयुष्य वेचले आहे.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

**सावित्रीबाई फुले यांचे सामाजिक कार्य:** सावित्रीबाई फुले यांनी स्त्री शिक्षणासाठी कार्य केले.त्याचबरोबर दलित व अस्पृश्य समाजासाठी देखील त्यांचे कार्य हे अतुलनीय आहे. समाजाच्या विरोधाला न जुमानता त्यांनी दलित व अस्पृश्य समाजातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाचे दालन उघडे केले. या मुलांना शिक्षण घेताना चांगली वागणूक मिळावी व त्यांच्यावर कुठल्याच प्रकारचा जातीभेद केला जाऊ नये यासाठी सावित्रीबाईंनी मुलांच्या शाळांचा अभ्यास केला व त्यावरून त्यांनी अनुमान काढला की "शूद्र आणि अतिशूद्र मुलांना शिकवण्यासाठी त्यांच्या समाजातीलच शिक्षक असावेत इतर उच्च जातीतले शिक्षक त्यांना तेवढ्या तळमळीने शिकवू शकत नाही."[4] दलित व अस्पृश्य समाजातील विद्यार्थ्यांसाठी सार्वजनिक विहिरी सर्वांसाठी उघड्या करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. विधवांसाठी बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना केली. बालहत्या प्रतिबंधक गृहाच्या माध्यमातून समाजाकडून तिरस्कृत केलेल्या महिलांचे पुनर्वसन करणे व त्यांना नवीन आयुष्य जगण्याचा अधिकार मिळवून देण्याचे कार्य या मार्फत केले जात असे. या गृहाच्या माध्यमातून बालविवाह झालेल्या विधवा तसेच अनाथ बालकांचा सांभाळ करण्याचे कार्य देखील सावित्रीबाईंनी केले. सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून सावित्रीबाईंनी समतेचा प्रचार केला.

महात्मा फुले यांच्या निधनानंतर सत्यशोधक समाजाची संपूर्ण जबाबदारी सावित्रीबाईंवर आले व तेवढ्याच ताकदीने त्यांनी ती सांभाळले "…. अरे परी पंचपात्रांच्या आवाजात पंचांग का गाता? त्यांनी महार मांगांना अस्पृश्य का समजता? केलेल्या तुमच्या या मूर्खपणाच्या वागण्याने तुमचे जात भाई ब्राह्मण ख्रिस्ती होत आहेत."[5] अशा परखड विचारातून त्यांनी सत्यशोधक समाजाचे कार्य सुरू ठेवले .सामाजिक कार्याचा पुरस्कार करताना त्यांनी केलेली समाजाची सेवा ही खूप मोठी देश सेवा मानली जाते. केवळ ज्ञानरूपी सेवाच नव्हे तर आरोग्य सेवा देखील सावित्रीबाईंनी समाजासाठी केलेली आहे. 1897 साली आलेल्या प्लेगच्या साथीच्या वेळी रुग्णांची सेवा करतानाच सावित्रीबाई फुले यांना संसर्ग झाला व त्यातच त्यांचे निधन झाले.

सावित्रीबाई फुलेंनी आपल्या जीवनात जातिव्यवस्था निर्मूलन स्त्री शिक्षण विधवा पुनर्वसन इत्यादी अनेक समाज परिवर्तन करणारी कार्य केले आहे या कार्याची जाणीव आज देखील प्रत्येक व्यक्तीला असणे गरजेचे आहे. त्यांनी दिलेले योगदान हे भारतीय समाजाच्या प्रगतीसाठी महत्त्वाचे ठरले आहे.

**सावित्रीबाई फुले यांची साहित्यिक कामगिरी**

सावित्रीबाई फुले केवळ शिक्षिकाच नव्हे तर एक उत्कृष्ट अशा साहित्यिक देखील होत्या. त्यांनी आपल्या लेखनातून स्त्री शिक्षण, जातीभेद निर्मूलन ,समता व अन्याय या विरुद्ध आवाज उठवला. त्यांना मराठी साहित्यातील आद्य कवयित्री म्हटले जाते. "सावित्रीबाईंनी काव्यफुले नावाचा काव्यसंग्रह 1954 साली प्रसिद्ध केला."[6] यामध्ये स्त्री शिक्षण, अंधश्रद्धा निर्मूलन, सामाजिक समानता याविषयीच्या कविता आहेत. अंधश्रद्धा निर्मूलन यावर आधारित त्यांच्या काव्यरचनेत सावित्रीबाईंनी म्हटले आहे की,

"गोट्याला शेंदूर ।फासुनी तेलात
वसती देवात। दगड तो ।।
म्हसोबा - खेसोबा । भयंकर देव
तयावर भाव । ठेवोनिया ।।
नवस करिती । बकरु मारीन
नवस फेडीन । बाळ जन्मी ।।


Copyright © | JET Network, All Rights Reserved

धोंडे मुले देती । नवसा पावती
लग्न का करती ।नारी नर ।।
सावित्री वदते । करुनी विचार
जीवन साकार ।करून घ्या ।।"[7]

तसेच 'बावनकशी सुबोध रत्नाकर' या काव्यसंग्रहातून त्यांनी आपल्या कवितांमधून त्यांनी लोकांना शिक्षण घेण्यास प्रवृत्त केले व जातीव्यवस्थेला विरोध केला. त्यांनी आपल्या काव्यात स्त्रियांचे दुःख, अन्याय, शिक्षणाची गरज, समाजातील विषमता आणि सुधारणा यांचा उल्लेख केला आहे. त्यांनी "सत्यशोधक समाज" च्या विचारांना समर्थन देणारे लेखन केले.सावित्रीबाई आणि ज्योतिराव फुले यांच्यातील पत्रसंवाद त्यांच्या विचारधारेचा एक महत्त्वाचा भाग आहे.

सावित्रीबाई फुले आणि महात्मा फुले यांच्यात झालेला पत्रसंवाद ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाचा मानला जातो. त्यांच्या पत्रांमध्ये स्त्री-शिक्षण, सामाजिक अन्याय, विधवांचे दुःख, आणि स्त्रियांची मुक्ती यासंबंधी विचार मांडले आहेत.त्यांनी शेतकरी, दलित, आणि महिलांसाठी प्रेरणादायी पत्रे लिहिली. गृहिणी नावाच्या मासिकात सावित्रीबाईंनी टोपण नावाने लेखन केले आहे स्त्रीविषयक विविध प्रश्नांवर त्यांनी या मासिकातून लेखन केले. मातोश्री सावित्रीबाईंची भाषणे आणि गाणे या लेखन संग्रहात देशहितासाठी उद्योगधंद्यांचे महत्त्व वर्णिले आहे. यासंबंधीच्या विवेचनात सावित्रीबाई म्हणतात, "... यासाठी दिवसभर न थकता उद्योग करणं हा माणसाचा उत्तम धर्म असून तो त्याचं कल्याण करणारा उत्तम मित्र आहे. या मित्राशिवाय कल्याण करणारा जगाच्या पाठीवर दुसरा कुणी मित्र नसतो याची खूणगाठ प्रत्येकाने बांधून ठेवावी."[8]

सावित्रीबाई फुले यांचे साहित्य म्हणजे केवळ कविता किंवा लेख नसून, ते समाजजागृतीचे एक प्रभावी साधन होते. त्यांनी आपल्या लेखनातून शिक्षणाचा महत्त्वपूर्ण संदेश दिला आणि स्त्रियांसाठी आत्मसन्मानाची चळवळ उभी केली.आजच्या काळात त्यांचे साहित्य महत्त्वाचे आहे.आजही स्त्री-शिक्षण आणि समानतेसाठी संघर्ष सुरू आहे.त्यांनी मांडलेले विचार सामाजिक सुधारणांसाठी प्रेरणादायी आहेत.त्यांच्या कवितांतून समाजासाठी जागरूकतेचा संदेश मिळतो.त्यांच्या कवितांनी आणि लेखनाने अनेक स्त्रियांना शिक्षणाचा मार्ग दाखवला आणि संपूर्ण समाजासाठी एक नवीन विचारधारा निर्माण केली. सावित्रीबाई फुले या केवळ शिक्षणप्रवर्तक नव्हेत, तर मराठीतील पहिल्या स्त्री-कवयित्री म्हणूनही त्यांचे योगदान महत्त्वपूर्ण ठरते.

**निष्कर्ष**

१. सावित्रीबाई फुले यांनी भारतात स्त्री शिक्षणाचा पाया रचला. स्त्री सक्षमीकरण हे शिक्षणामुळेच शक्य आहे हे त्यांनी आपल्या कार्यातून सिद्ध केले.

२. सावित्रीबाईंनी केवळ शिक्षण क्षेत्रातच नव्हे, तर सामाजिक सुधारणांसाठीही महत्त्वपूर्ण योगदान दिले. विधवा पुनर्वसन, स्त्री-पुरुष समानता, जातिभेद निर्मूलन यांसाठी त्यांनी मोठा संघर्ष केला. समाजात समानता निर्माण करण्याचे कार्य सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून केले.

३. सावित्रीबाईंनी केवळ स्त्रियांसाठीच नव्हे, तर दलित आणि वंचित समाजाच्या शिक्षणासाठीही मोठे कार्य केले. त्यांनी अस्पृश्यांसाठी स्वतंत्र शाळा सुरू केल्या, जातीभेद आणि सामाजिक विषमता दूर करण्यासाठी त्यांनी सार्वजनिक विहिरी सर्वांसाठी खुल्या करण्याचा निर्णय घेतला.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

४. सावित्रीबाईंनी आपल्या कवितांमधून आणि लेखनातून स्त्री शिक्षण, जातीभेद निर्मूलन, अंधश्रद्धा निर्मूलन यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर भाष्य केले. त्यांच्या साहित्यातून शिक्षणाचा प्रसार आणि सामाजिक परिवर्तनाचा संदेश मिळतो.
५. सावित्रीबाई फुले यांचे विचार हे आज देखील समानता अंधश्रद्धा निर्मूलन , स्त्री शिक्षण, स्त्री सक्षमीकरण यासाठी मार्गदर्शक ठरते. समाज परिवर्तनाचे त्यांचे कार्य हे प्रेरणादायी आहे.
६. सावित्रीबाईंच्या कार्यामुळे आजच्या स्त्रियांना शिक्षण, रोजगार आणि समान हक्क मिळू शकले. त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेणे महत्वपूर्ण आहे

**संदर्भसूची**

१. नाझरेत डॉ. मिस्किटा, स्त्री-शिक्षणाची वाटचाल, लोकवाङ्मय गृह, भूपेश गुप्ता भवन ८५, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई ४०००२५, आवृत्ती पहिली, मे २०१४, पृष्ठ क्रमांक १४
२. पाटील अजित, तेजस्विनी सावित्रीबाई फुले, सायन पब्लिकेशन्स प्रा.लि.,स्वोजस हाऊस ११५९, सदाशिव पेठ, पुणे - ४११०३०, आवृत्ती पहिली, २० मार्च २०१५, पृष्ठ क्रमांक ३४
३. पाटील अजित, तेजस्विनी सावित्रीबाई फुले, सायन पब्लिकेशन्स प्रा.लि. स्वोजस हाऊस, ११५९, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०, आवृत्ती पहिली, २० मार्च २०१५, पृष्ठ क्रमांक ३८
४. पाटील अजित, तेजस्विनी सावित्रीबाई फुले, सायन पब्लिकेशन्स प्रा.लि. स्वोजस हाऊस, ११५९, सदाशिव पेठ, पुणे - ४११०३०, आवृत्ती पहिली, २० मार्च २०१५, पृष्ठ क्रमांक ३८
५. पाटील अजित, तेजस्विनी सावित्रीबाई फुले, सायन पब्लिकेशन्स प्रा.लि. स्वोजस हाऊस, ११५९, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०, आवृत्ती पहिली, २० मार्च २०१५, पृष्ठ क्रमांक ४७
६. पाटील अजित, तेजस्विनी सावित्रीबाई फुले, सायन पब्लिकेशन्स प्रा.लि. स्वोजस हाऊस, ११५९, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०, आवृत्ती पहिली, २० मार्च २०१५, पृष्ठ क्रमांक ५०
७. पाटील अजित, तेजस्विनी सावित्रीबाई फुले, सायन पब्लिकेशन्स प्रा.लि. स्वोजस हाऊस, ११५९, सदाशिव पेठ, पुणे - ४११०३०, आवृत्ती पहिली, २० मार्च २०१५, पृष्ठ क्रमांक ५३
८. पाटील अजित, तेजस्विनी सावित्रीबाई फुले, सायन पब्लिकेशन्स प्रा. लि. स्वोजस हाऊस, ११५९, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०, आवृत्ती पहिली, २० मार्च, २०१५, पृष्ठ क्रमांक ५०


Copyright © | JET Network, All Rights Reserved